महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५,६००-३९,१०० + ग्रेड पे रुपये ५,४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश, क्रमांकः न्यायिक- २०१७/प्र.क्र.४६१/सेवा-३
१० वा मजला, संकुल इमारत, गो.ते. रुग्णालय, संकुल इमारत,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक : १४ मार्च, २०१८.

वाचा : १) शासन आदेश, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः मवैअ २०१५/प्र.क्र.५७१/सेवा-३, दिनांक ३१.०५.२०१५

२) शासन आदेश, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः मवैअ २०१५/प्र.क्र.६२५/सेवा-३, दिनांक ०२.११.२०१५

३) शासन आदेश, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. मवैअ २०१५/प्र.क्र.६२५/१५/सेवा-३, दिनांक २३.०५.२०१६

४) शासन आदेश, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः बदली २०१७/प्र.क्र. ३५५/सेवा-३, दिनांक १०.१०.२०१७

५) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे मूळ अर्ज क्र.९६७/२०१७ बाबत दि.२९.०१.२०१८ चे आदेश

शासन आदेश :-

डॉ. मुकुंद महादेव सादिगले यांची ग्रामीण रुग्णालय कागल येथून वाचा येथील क्र.१ येथील दि.३१.०५.२०१५ च्या आदेशान्वये ग्रामीण रुग्णालय मुरगूड जि.कोल्हापूर येथे बदली झाली होती. वाचा येथील अ.क्र.३ येथील दि.२३.०५.२०१६ च्या आदेशान्वये दि.३१.०३.२०१७ पर्यंत स्थगिती देण्यात आलेली होती. त्यांना सदर पदावर मुदतवाढ न मिळाल्याने ग्रामीण रुग्णालय कागल येथून त्यांना दि.१६.०५.२०१७ रोजी कार्यमुक्त करण्यात आले. त्यांनी दि.२१.०६.२०१७ च्या अर्जान्वये ग्रामीण रुग्णालय कागल येथेच पुन्हा पदस्थापना देण्याची विनंती केली. नागरी सेवा मंडळाने त्यांची सदर विनंती मान्य केली नाही व त्यांची उपजिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज जि.कोल्हापूर येथे पदस्थापना देण्याची शिफारस केली व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त झाल्यानंतर वाचा येथील अ.क्र.४ येथील दि.१०.१०.२०१७ च्या अदेशान्वये डॉ.सादिगले यांची पदस्थापना उपजिल्हा रुग्णालय गडहिंग्लज येथे करण्यात आली. सदर आदेशविरुध्द डॉ.सादिगले यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणापुढे मुळ अर्ज क्र. ९६७/२०१७ सादर केला होता. मा. न्यायाधिकरणाने दि.२९.०१.२०१८ अन्वये सदर मूळ अर्ज खारीज करुन शासनास संदिग्धता दूर करुन सुधारित आदेश पारित करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार उपजिल्हा

रुग्णालय गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथे पद रिक्त नसल्याने, डॉ. सादिगले, वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांची त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीने व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने ग्रामीण रुग्णालय, मलकापूर, जिल्हा कोल्हापूर येथे सुधारित पदस्थापना करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१४१५५०३९९८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Hanmantrao Bhosale

Digitally signed by Satish Hanmantrao Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4c0ff0607bc973d9663171bd9b8a9b9ab8cb569b155f9653d1180a4549819299, cn=Satish Hanmantrao Bhosale
Date: 2018.03.14 16:36:58 +05'30'

(स. ह. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र १ /२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर.
२) आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई.
३) संचालक आरोग्य सेवा, मुंबई.
४) उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर.
५) जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
७) जिल्हा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर.
८) संबधित अधिकारी (उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, कोल्हापूर यांचे मार्फत).
९) निवडनस्ती (सेवा-३)